Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक १६] गुरूवार ते बुधवार, एप्रिल २२-२८, २०२१/वैशाख २-८, शके १९४३ [ पृष्ठे १०, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-२ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | २-१० |
| **भाग एक-अ.**–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६०.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated 30th March, 2021.

No. SPP-2021-399-C.R.44-D-XIV.—

In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of the Section 24 of the Code of Criminal Procedure, 1973 (Act No. II of 1974), the Government of Maharashtra hereby appoints Adv. Uday A. Deshmukh as “Special Public Prosecutor” for conducting the Session Case No. 34/2020 pending before Sessions Court, Washim, which is arising out of C. R. No. 23/2020 registered at Washim City Police Station, Dist. Washim.

2. Lump sum fees of Rs. 40,000 (Rupees Forty Thousand only) as quoted by Adv. Uday A. Deshmukh has been already deposited by the Applicant Shri Vijaykumar Motiram Jadhav to the Government *vide* R.B.I. Challan No. 019992, dated 23-03-2021. The amount will be paid to Adv. Uday A. Deshmukh after completion of the case.

3. His appointment is strictly subject to the conditions of service laid down in the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984.

4. The Government reserves right to revoke/modify/annul the order without assigning any reason.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI P. BORUDE,
Section Officer.

---

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६१.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमाक प्र.अ.-भू.सं.-अ.का.-कावि-२०३-२०२१.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र.७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांस या सोबत जोडलेल्या अनुसूची-एक-मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनूसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत य प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमि-संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक २, अमरावती यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ५-४७-२०१६-१७, मौजा पाटीया, ता. धारणी, जिल्हा अमरावती

| अ. क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर. |
| १ | ७१ | २ ३५ |
| २ | ७२ | १ ७५ |
| ३ | ७३ | १ ७८ |
| ४ | ७४ | ३ ५२ |
| ५ | ७६ | ५ ८१ |
| ६ | ७८ | ३ ५३ |
| ७ | ७९ | ० २३ |
| ८ | ८२ | ० ६५ |
| ९ | ८३ | २ ४४ |
| १० | ८५ | १ ६८ |
| ११ | ८६ | ० ३५ |
| १२ | ९२/ब | ० ११ |
| | एकूण . . | २४ २० |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | : | पाटीया ल. पा. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे कामाकरीता. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | : | पाटीया ल. पा. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे कामाकरीता. |
| सामाजाला मिळणारे लाभ | : | पाटीया ल. पा. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे. |

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

**अनुसूची-चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची आवश्यकता नाही.)

सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ अ, महसूल व वन विभाग, मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसूचना अन्वये सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम | : | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | : | निरंक |
| (अ) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | : | निरंक |

**टीप.**—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर वर्धा प्रकल्प क्रमांक २, अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**शैलेश नवाल,**

अमरावती :
दिनांक ३१ मार्च २०२१.

जिल्हाधिकारी,
अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६२.

**वाचा.**—(१) भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १९(७).

(२) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांचे पत्र क्र. शिरस्तेदार-का.वि.-२५१४-२०२०, दिनांक ३०-१२-२०२० प्राप्त दि. ३०-१-२०२०.

**आदेश**

क्रमांक जिका-अका-भूसंपादन-आ.क्र.११६७-कावि-०६-२०२१.—

ज्याअर्थी,उपरोक्त वाचामध्ये उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांनी दि. ३०-१२-२०२० रोजीचे पत्रान्वये भूसंपादन प्र.क्र.एल.ए.क्यु.४७-खांबोरा-४-२०१८-१९ ता. अकोला या प्रकरणात दि. १६-०१-२०२० रोजी काढण्यात आलेल्या कलम ११ ची अधिसूचनेचा

कालावधी दि. १६-०१-२०२१ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे सदर प्रकरण व्यपगत होत असून, त्यास भूमि संपादन-पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिनियम २०१३ " असा करण्यात आला आहे) चे नियम २५ मधील तरतुदीप्रमाणे पुनश्च ६ महिन्याची मुदतवाढ देणेबाबत विनंती केलेली आहे ;

आणी ज्याअर्थी, अधिनियम, २०१३ मधील नियम १९(७) मध्ये, " जेव्हा प्राथमिक अधिसूचनेच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत पोट-कलम (१) अन्वये कोणतीही घोषणा प्रसिद्ध केलेली नसेल तेव्हा, अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु, आणखी असे की, समुचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल ......" असे स्पष्ट नमूद केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांनी दि. ३०-१२-२०२० रोजीचे पत्रामध्ये भूमि संपादन कायदा-२०१३ अंतर्गत कलम-११ च्या प्रसिद्धीनंतर कलम-१९ ची अधिसूचना प्रसिद्धी करण्यापूर्वी यंत्रणेने निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यंत्रणा-कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी त्यांचे कार्या. पत्र दिनांक ३-१२-२०२० नुसार निधीची मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे केली आहे. कोव्हीड-१९ मुळे वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त होण्यास विलंब होत आहे. सदर निधी प्राप्त होताच जमा करण्यात येईल असे पत्र या कार्यालयास दिले आहे.

तरी प्रकरण व्यपगत होवू नये म्हणून कलम-११ च्या अधिसूचनेचा कालावधी किमान ६ (सहा) महिन्यांनी म्हणजेच जून, २०२१ पर्यंत वाढवून देण्यात यावा अशी विनंती संदर्भ वाचा क्र. (२) नुसार या कार्यालयास केली आहे.

उक्त प्रकरणी विहित मुदतीच्या आंत कार्यवाही करणे शक्य होत नसल्यामुळे सदरहु प्रकरणात कलम १९(७) अन्वये ६ महिन्याची मुदतवाढ घेणेबाबत कळविले आहे. त्याअर्थी, सदरची बाब ही अधिनियम, २०१३ मधील नियम १९(७) नुसार समर्थन करणा-या परिस्थितीमध्ये येत असल्याचे निष्कर्षापर्यंत मी येऊन पोहचतो ;

आणि ज्याअर्थी, अधिनियम २०१३ मधील नियम ३ चे खंड (इ) च्या परंतुकाद्वारे जिल्ह्यामधील सार्वजनिक प्रयोजनाच्या बाबतीत, जिल्ह्याचे जिल्हाधिकारी समुचित शासन असल्याचे समजण्यात येईल.

त्याअर्थी, अधिनियम, २०१३ मधील नियम ३ चे खंड (इ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी, अकोला समुचित शासन या नात्याने नियम १९(७) चे परंतुकाद्वारे प्रावधान असलेली समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असल्यामुळे, पूर्वव्यापी तसेच संभाव्य प्रभावाने, भूसंपादन प्र.क्र.एल.ए.क्यु.४७-खांबोरा-४-२०१८-१९, ता. अकोला या प्रकरणामधील, पत्र क्र. उविअ-भूसंपादन-कावि-०३-२०२०, दि. ०४-०१-२०२० अन्वये काढण्यात आलेल्या कलम-११ च्या प्राथमिक अधिसूचनेच्या ६ (सहा) महिन्याचा कालावधीस, म्हणजेच दि. ०४-०१-२०२१ पासून पुढे सहा महिन्याची वाढ प्रदान करीत आहे. सबब मंजूर केलेल्या कालावधीत प्रस्तुत प्रकरणातील कार्यवाही पूर्ण करून प्रकरण निकाली काढावे.

दिनांक १ जानेवारी २०२१.

अ.-एक-२ (१५१५ ).

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६३.

**वाचा :** (१) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम-१९(७).

(२) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांचे पत्र, क्र.-शिरस्ते-का.वि.९४-४३२-२०२१, दिनांक १८-०१-२०२१ व दिनांक २५-०२-२०२१.

**आदेश**

क्रमांक जिका-अका-भूसंपादन-आ.क्र. ८०, २७०-कावि-१५०-२०२१.––

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांनी संदर्भीय पत्रान्वये भूसंपादन प्र.क्र.एल.ए.क्यु.४७-सांगवी खुर्द-०२-२०१८-१९, ता. अकोला या प्रकरणात दिनांक ०३-०७-२०१९ रोजी काढण्यात आलेल्या कलम ११ ची अधिसूचनेचा कालावधी दिनांक ०३-०७-२०२० रोजी संपुष्टात आली असून त्यास भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिनियम २०१३ " असा करण्यात आला आहे.) चे नियम २५ मधील तरतुदीप्रमाणे पुनश्च एक वर्षाची मुदतवाढ देणेबाबत विनंती केलेली आहे ;

व ज्याअर्थी, अधिनियम, २०१३ मधील नियम १९ (७) मध्ये, " जेव्हा प्राथमिक अधिसूचनेच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत पोट-कलम (१) अन्वये कोणतीही घोषणा प्रसिद्ध केलेली नसेल तेव्हा, अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु, आणखी असे की, समुचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल...... " असे स्पष्ट नमूद केले आहे;

व ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अकोला यांनी दिनांक १८-०१-२०२१ व दिनांक २५-०२-२०२१ रोजी पत्रामध्ये, भूमि संपादन कायदा, २०१३ अंतर्गत कलम-११ च्या प्रसिद्धीनंतर कलम-१९ ची अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी यंत्रणेने निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यंत्रणा-कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी त्यांचे कार्या, पत्र दिनांक ०३-१२-२०२० नुसार निधीची मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे केली आहे. कोव्हीड-१९ मुळे वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त होण्यास विलंब होत आहे. सदर निधी प्राप्त होताच जमा करण्यांत येईल असे पत्रात नमूद केले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी दिनांक ३१-०३-२०२१ रोजी निधी प्राप्त झाल्याचे व मागणीनुसार निधी भूसंपादन अधिकारी यांना पुरविण्यांत येईल असे सांगितले आहे.

उक्त प्रकरणी कलम १९ ची कार्यवाही करणे शक्य होत नसल्यामुळे सदरहू प्रकरणात कलम १९(७) अन्वये, एक वर्षाची मुदतवाढ घेणेबाबत कळविले आहे. त्याअर्थी सदरची बाब ही अधिनियम, २०१३ मधील नियम १९(७) नुसार समर्थन करणा-या परिस्थितीमध्ये येत असल्याचे निकर्षापर्यंत मी येऊन पोहचतो;

व ज्याअर्थी, अधिनियम, २०१३ मधील नियम ३ चे खंड (इ) च्या परंतुकाद्वारे जिल्ह्यामधील सार्वजनिक प्रयोजनाच्या बाबतीत, जिल्ह्याचे जिल्हाधिकारी समुचित शासन असल्याचे समजण्यात येईल;

त्याअर्थी, अधिनियम २०१३ मधील नियम ३ चे खंड (इ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मी, जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी, अकोला, समुचित शासन या नात्याने नियम १९(७) चे परंतुकाद्वारे प्रावधान असलेली समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असल्यामुळे, पुर्वव्यापी तसेच संभाव्य, भूसंपादन प्र.क्र.एलए.क्यु.४७-सांगवी खुर्द-०२-२०१८-१९, ता.अकोला या प्रकरणामधील, पत्र क्र. उविअ-भूसंपादन-कावि-१६२६-२०१९, दिनांक ०३-०७-२०१९ अन्वये काढण्यात आलेल्या कलम-११ च्या प्राथमिक अधिसूचनेच्या १२ महिन्याच्या कालावधीस, म्हणजेच दिनांक ०३-०७-२०२० पासून पुढे १२ (बारा) महिन्याची वाढ प्रदान करीत आहे. सबब मंजूर केलेल्या कालावधीत प्रस्तुत प्रकरणातील कार्यवाही पूर्ण करून प्रकरण निकाली काढावे.

अकोला :
दिनांक ३१ मार्च २०२१.

**जितेंद्र पापळकर** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
अकोला.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६४.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११(१) अन्वये.**

क्रमांक कावि-अका-भूसंपादन-मौ.वकाणा-४७०-२०२१.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. एम.आय.एस. ११-२०१४-सी.आर.७१–ओ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे, असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा केला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे या सोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्स्थापना या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जा., यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०७-२०२०-२०२१, गाव वकाणा, तालुका संग्रामपूर, जिल्हा बुलडाणा.

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १७७ | ० १५ |

**अनुसूची-एक.**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | हे. आर |
| २ | १७८ | ० ५२ |
| ३ | १७९ | ० ३६ |
| ४ | १८० | ० ८१ |
| ५ | १८२ | ० ८१ |
| ६ | २६२ | ० १८ |
| ७ | २६२ | ० ६८ |
| ८ | २६२ | ० ६० |
| ९ | २६५ | ० २४ |
| १० | २६५ | ० ४० |
| ११ | २६६ | ० ३५ |
| १२ | २६८ | ० ७१ |
| १३ | २६९ | १ ०८ |
| १४ | २७० | ० १५ |
| १५ | २७१ | ० ३६ |
| १६ | २७४ | ० ४० |
| १७ | २७४ | ० ४० |
| १८ | २७६ | ० ०२ |
| १९ | २७६ | ० ०२ |
| २० | २७६ | ० ०२ |
| २१ | २७६ | ० ०२ |
| २२ | २७६ | ० ०१ |
| २३ | २७६ | ० ०१ |
| २४ | २७७ | ० ०२ |
| २५ | २७८ | ० ०२ |
| २६ | २९० | ० ११ |
| | एकूण . . | ८ ४५ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :— मौ. चोंढी बृहत लघु पाटबंधारे योजना ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा.

प्रकल्प कार्याचे वर्णन :— मौजे चोंढी बृहत लघु पाटबंधारे योजनेचे बुडीत क्षेत्र व धरणाच्या भिंतीसाठी मौ. वकाणा, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथील खाजगी जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव.

समाजाला मिळणारे लाभ :— या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची–तीन

### बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदरचा प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून त्यास शेतक-यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्याने तसेच त्यामधील व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची–चार

### सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

अतिरिक्त संचालक, भारत सरकार व पर्यावरण मंत्रालय, पर्यावरण भवन, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३ क्रमांक जे-१२०११-२२-२००७-आयएआय, दिनांक ११ फेब्रुवारी २००७ अन्वये पर्यावरण सर्व्हेक्षण मंजुरी झालेली असल्याने भूसंपादन अधिनियम, २०१३ चे प्रकरण क्र. ०२, कलम ०६(२) चे परंतुकानुसार-provided that in respect of irrigation project where the process of Environment Impact Assessment is required under the provision of any other law for the time being in force, the provision of the Act relating to Social Impact Assessment shall not apply असे नमूद केले असल्याने सामाजिक परिणाम निर्धारण लागू नाही.

## अनुसूची–पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा अनुषेश-ग्रस्त जिल्ह्यातील दुष्काळ प्रवण भागातील असून अतिशय कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गांवठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. :— सबब प्रशासक नियुक्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :— निरंक

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील :— निरंक

**टीप :**—उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद, जि. बुलडाणा यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

बुलडाणा :

दिनांक १६ मार्च २०२१.

**एस. राममुर्ती** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, बुलडाणा.

अ.-एक-३ (१५१५).

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६५.

## अपर जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन प्रशासक, यांजकडून

### शुद्धीपत्र

क्रमांक कावि-पुनर्व-कक्ष-२१-अका-१३७-२०२१.—

विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती ह्यांची जिगाव प्रकल्प, तालुका नांदुरा, जिल्हा बुलडाणा या प्रकल्पाच्या योजनेची कलम १३(१) ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक २९ जून २००६ रोजी पृष्ठ १०९५-११०२, अ.क्र. ६७५ वर प्रसिद्ध झाली आहे. त्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.—

| च्या ऐवजी | | | | | असे वाचावे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | लाभक्षेत्र हे. आर | अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | लाभक्षेत्र हे. आर |
| ४४ | नारखेड | नांदुरा | बुलडाणा | ५५ ६२ | ४४ | नारखेड | नांदुरा | बुलडाणा | ५४ ०१ |

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४६६.

### शुद्धीपत्र

क्रमांक कावि-पुनर्व-कक्ष-२१-अका-१३८-२०२१.—

विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती ह्यांची जिगाव प्रकल्प, तालुका नांदुरा, जिल्हा बुलडाणा या प्रकल्पाच्या योजनेची कलम १३(१) ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक २९ जून २००६ रोजी पृष्ठ १०९५-११०२, अ.क्र. ६७५ वर प्रसिद्ध झाली आहे. त्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.—

| च्या ऐवजी | | | | | असे वाचावे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | लाभक्षेत्र हे. आर | अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | लाभक्षेत्र हे. आर |
| १७० | मांडका | खामगांव | बुलडाणा | ४९९ ५३ | १७० | मांडका | खामगांव | बुलडाणा | ४९९ १३ |

बुलडाणा :
दिनांक ७ एप्रिल २०२१.

(अवाच्य),
अपर जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन प्रशासक,
बुलडाणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.